# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभा दि ०३/११/२०२३

## कार्यवृत्त

आज दि ०३/११/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या आरोग्य, विद्युत व शिक्षण विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | आरोग्य विभाग |
| १ | नगर परिषद मलकापूर च्या मालकीचे Mobile Toilet (फिरते शौचालय) भाडेतत्वावर देणे बाबत. |
| | विद्युत विभाग |
| २ | नगरपरिषद मलकापूर कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये Roof Top AC. बसविणे बाबत |
| | शिक्षण विभाग |
| ३ | कैसर परवीन शेख शब्बीर सहा. शिक्षिका यांच्या स्वेच्छा निवृत्ती मिळणे बाबतच्या अर्जाला मंजुरी देणे बाबत. |

**विषय क्र १:- नगर परिषद मलकापूर च्या मालकीचे Mobile Toilet (फिरते शौचालय) भाडेतत्वावर देणे बाबत.**

नगर परिषद मलकापूर च्या मालकीचे Mobile Toilet (फिरते शौचालय) भाडेतत्वावर देणे बाबत प्र. आरोग्य निरीक्षक यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, प्र. आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नगर परिषद मलकापूर च्या मालकीचे Mobile Toilet (फिरते शौचालय) ला शहरातील नागरिकांकडून विविध प्रसंगी तसेच कार्यक्रमासाठी मागणी होत असते. त्यामुळे सदरचे शौचालय भाडेतत्वावर उपलब्ध करून देणे नगरपरिषदेच्या दृष्टीने सोयीचे होईल. त्यानुसार फिरते शौचालायचे भाडे दर नगरपरिषद हद्दीपासून ५ कि.मी. अंतरा पर्यंत प्रती दिन १०००/- रु व ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतर असल्यास रु ३०००/- प्रती दिन असा असेल. तसेच शौचालय नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा जलशुद्धीकरण केंद्राच्या आवारातून घेऊन जाणे व सुस्थितीत परत आणून देण्याची सर्वस्वी जबाबदारी भाडे तत्वावर नेणाऱ्या नागरिकांची राहील.

वरील सर्वबाबींचा विचार करता नगर परिषद मलकापूर च्या मालकीचे Mobile Toilet (फिरते शौचालय) भाडेतत्वावर देण्याच्या कार्यवाहीस व नमूद केलेले भाडे दर हे दि. ०१ नोव्हेंबर २०२३ पासून लागू करण्यास हि सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र २ :- नगरपरिषद मलकापूर कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये Roof Top AC. बसविणे बाबत**

नगरपरिषद मलकापूर कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये Roof Top AC. बसविणे बाबत विद्युत अभियंता यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, विद्युत अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार दि २३/०९/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी केलेल्या मलकापूर दौऱ्यात मलकापूर न.प. च्या प्रशासकीय इमारतीची पाहणी करते वेळेस मा. जिल्हाधिकारी यांनी न.प. कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक सभागृहाला भेट दिली असता त्यांनी सभागृहांमधील आसन क्षमता बघून सभागृहामध्ये AC बसून घेण्याबाबत तोंडी आदेश दिले. त्यानुसार सदर सभागृहाची पाहणी केली असता असे लक्षात आले की, सभागृहाला खिडकी नसल्यामुळे सभागृहात हवेचा प्रवाह कमी आहे. त्याकरिता नगरपरिषद सभागृहाची स्थिती बघून सभागृहाला ६ **Roof Top AC** ची गरज असून सदर कामास अंदाजित ९ /- लक्ष खर्च असल्याचे नमूद केले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता नगर परिषद मलकापूर कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आसन क्षमतेनुसार व सभागृहाल खिडक्या नसल्या कारणाने हवेचा पुरेसा प्रवाह नसल्यामुळे न.प. सभागृहात **Roof Top AC.** बसविण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. निधीतून करण्यास हि सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र ३:- कैसर परवीन शेख शब्बीर सहा. शिक्षिका यांच्या स्वेच्छा निवृत्ती मिळणे बाबतच्या अर्जाला मंजुरी देणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून कैसर परवीन शेख शब्बीर सहा. शिक्षिका उर्दू कन्या शाळा पारपेठ. यांनी दि ०४/०७/२०२३ रोजी स्वेच्छा निवृत्ती मिळणे बाबत अर्ज सादर केला आहे. त्यांची नियुक्ती दि ०१/०९/१९९५ रोजी असून आजपर्यंत त्यांची एकूण सेवा २८ वर्षे पूर्ण झाली आहे. त्या सध्या न.प. उर्दू प्राथमिक कन्या शाळा पारपेठ, मलकापूर येथे सहाय्यक शिक्षिका या पदावर कार्यरत आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरविण्यात येते की, कैसर परवीन शेख शब्बीर सहा. शिक्षिका उर्दू कन्या शाळा पारपेठ यांच्या स्वेच्छा निवृत्ती मिळणे बाबतच्या अर्जाला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम ६५ पोटकलम १ (अ) अन्वये कार्यवाही करून ३० नोव्हेंबर २०२३ रोजी स्वेच्छा निवृत्ती देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर.यु. सुरडकर**
**प्रशासक**
**नगर परिषद मलकापूर.**